**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्रमांक उप आयुक्त / म.भ.प्रा./4701 दिनांक 01.01.2015

# प रि प त्र क

विषय - मुंबई महानगरपालिकेत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या व्यवसाय विकास खात्यामधील रिक्त पदे महानगरपालिका सेवेत कार्यरत असणा-या व सदर पदांची अर्हता व अनुभव संपादन करणा-या कर्मचा-यांमधून कार्यालयीन व्यवस्थेअंतर्गत भरण्याबाबत.

संदर्भ - 1. अति.आ/ पू.उप./2207, दिनांक 24.09.2014.
2. आयुक्तांची मंजुरी क्रमांक एमजीसी/एफ/5029, दि. 29.11.14.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या व्यवसाय विकास खात्यामधील खाली नमूद करण्यात आल्याप्रमाणे रिक्त पदे महानगरपालिकेच्या सेवेत नियमित स्वरुपात कार्यरत असणा-या व सदर पदांची अर्हता व अनुभव संपादन करणा-या कर्मचा-यांमधून कार्यालयीन व्यवस्थेअंतर्गत भरावयाची आहेत. यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नियमित स्वरुपात कार्यरत असणा-या व सदर पदांची अर्हता धारण करणा-या इच्छुक कर्मचा-यांमधून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. कर्मचा-यानी त्यांचे अर्ज त्यांच्या खातेप्रमुखामार्फत उप आयुक्त (म.भ.प्रा.) यांचे कार्यालय, मुख्यालय, नवीन इमारत , 6 वा मजला , महापालिका मार्ग, मुंबई - 400 001 येथे दिनांक 15.01.2015 पर्यंत सादर करावेत.

1. पदाचे नाव - उप प्रमुख (पायाभूत सुविधा कक्ष (खुला प्रवर्ग - 1 पद )
   वेतनश्रेणी - P.B. 3 , Rs. 15600 – 39100 + GRP + 6600
   अर्हता - B.E.(Civil)
   अनुभव - संबंधित कामाचा किमान 5 वर्षाचा अनुभव.
2. पदाचे नाव - उप प्रमुख (विधी कक्ष) - ( खुला प्रवर्ग - 1 पद )
   वेतनश्रेणी - P.B. 3 , Rs. 15600 – 39100 + GRP + 6600
   अर्हता - L.L.B.
   अनुभव - संबंधित कामाचा किमान 5 वर्षाचा अनुभव.
3. पदाचे नाव - व्यवस्थापक - समन्वय व परवानग्या (अनुसूचित जाती - 1 पद )
   अर्हता - कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विदयापिठाची पदवी आणि माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील पदविका.
   वेतनश्रेणी - P.B. 3 , Rs. 15600 – 39100 + GRP + 6000
   अनुभव - संबंधित कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव.

सदर पदासाठी अर्ज करणा-या व विहित अर्हता प्राप्त करणा-या कर्मचा-यांची मुलाखत घेण्यात येईल व गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. सदर कर्मचारी सदर पदावर कार्यालयीन व्यवस्थेअंतर्गत काम करतील, तद्नंतर त्यांच्या कामाचे 2 वर्षाचे मुल्यमापन करण्यात येऊन त्यांना सदर पदावर सामावून घेण्याचा विचार करता येईल.

खाते प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारितील कार्यरत असणा-या कर्मचा-याकडून प्राप्त झालेल्या अर्जांच्या अनुषंगाने शिफारस करुन त्यांना कार्यालयीन व्यवस्थेअंतर्गत व्यवसाय विकास खात्यामध्ये पाठविण्याबाबत 'ना हरकत प्रमाणपत्र' दयावे.

सर्व खाते प्रमुख, सहाय्यक आयुक्त यांना असे सूचित करण्यात येत आहे कि त्यांनी सदर परिपत्रकास जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्ज उप आयुक्त (म.भ.प्रा.) यांचे कार्यालयात दिनांक 15.01.2015 रोजी वा तत्पूर्वी पोचतील हे पहावे.

**सही /- 22.12.14**
**( प्र.रा.सातपुते)**
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**

**सही/- 26.12.14**
**(भारत रा. मराठे)**
**उप आयुक्त (म.भ.प्रा.)**

प्रत : -------------------------------------------------------------

माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

**उप आयुक्त (म.भ.प्रा.)**
**यांचे प्रशासकीय अधिकारी**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अर्जाचा नमुना (कर्मचा-यांकडून व्यवसाय विकास खात्यामधील पदासाठी)

1. पदाचे नाव -

2. कर्मचा-याचे नाव -

3. शैक्षणिक अर्हता -

4. अनुभव -

5. सध्या धारण करीत असलेले पद -

   वेतनश्रेणी -

6. अखंडीत सेवेतील नियुक्ती दिनांक व पदाचे नाव -

7. उमेदवार मागासवर्गीय आहे काय ?
   असल्यास जात ------------ प्रवर्ग ---------------- असल्यास
   जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे ?

8. उमेदवारांविरुध्द खात्यांतर्गत चौकशी प्रलंबित व
   प्रस्तावित आहे का ? उमेदवार शिक्षाधीन आहे का ?

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की वरील माहिती जाणीव पूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. त्यापैकी कोणतीही खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावण्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.

आपला विश्वासू,

अर्जदाराची सही

अर्जदाराचे नाव

दिनांक

सोबत - प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रतिलिपी
1.
2.

वरील तपशील कर्मचा-यांच्या सेवा अभिलेखावरुन पडताळून पाहता तो खरा असल्याचे आढळले. उपरोक्त कर्मचा-यांची निवड झाल्यास त्याला कार्यालयीन व्यवस्थेअंतर्गत कार्यमुक्त करण्यात येईल.

**प्रशासकीय अधिकारी** **खाते प्रमुख**